Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 189 –194
DOI: 10.5281/zenodo.10115355

Original Research Article

# महात्मा गांधीजी प्रणीत स्त्री सबलीकरण एक सिंहावलोकन

प्रोफेसर डॉ. राजू शिवाजी कोंडेकर

संशोधन मार्गदर्शक व विभागप्रमुख, इतिहास विभाग, राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, जि. नांदेड ४३१८०६ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: drkondekar9@yahoo.com

Received: 15 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 27 October, 2023

**प्रस्तावना**

स्त्री-पुरुष यांच्यातील सामाजिक भेद आणि स्त्रियांचे गौण स्थान यांची कारणे नैसर्गिकतेबरोबरच सांस्कृतिकदेखील आहेत. प्राण्यांमध्ये नर आणि मादी यांच्या वर्तणुकीतील फरक नैसर्गिक असतात परंतु माणसामध्ये तसे नाही. आपल्यावर लहानपणी झालेले संस्कार आपण आयुष्यभर एकमेकांशी व्यवहार करीत असताना एकमेकांवर करतो ते संस्कार, आपले विचार, साहित्य कला, शिक्षण यांच्यातून स्त्री-पुरूष भेद समाजामध्ये आकार घेत असतो. त्यालाच आपण स्त्री-पुरूष भेदाची सांस्कृतिक कारणे म्हणू शकतो.

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्राम्हणी समाजाभेवती घोटाळणारी विषमता व स्त्री विषयक अत्याचारावर अनेक विचारवंतांनी आवाज उठवा. महात्मा ज्योतीराव फुलेंनी मूळ समस्येस हात घालून स्त्री-पुरूष समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीदास्य व जातीव्यवस्थेवर आघात केला. महात्मा गांधींनी बालविधवा, बालविधवा विवाह, सतीप्रथा, हुंडा पद्धती सर्वांच्या बाबत निखळ नि:संदिग्ध भूमिका घेतली आहे. बालविधवा, बालविवाह या प्रथा पंधरा टक्के उच्चभ्रू समाजाच्या प्रथा आहेत हे त्यांनी वारंवार मांडले. त्याचबरोबर कायद्याच्या उपयुक्ततेबद्दलही त्यांनी शंका व्यक्त केली. स्त्रीची नैतिक शक्ती वाढविणे. अशा अत्याचारा विरोधात संपूर्ण समाजाला उभे करणे हे गांधीजीच्या मते खरे उपाय आहेत. कायदे करणे व न्याय देणे पुरुषांच्या हाती असेल तर उतर कायद्याने कसे मिळेल असा प्रश्न त्यांनी केला. त्यासाठी राजकीय सत्तेतील स्त्रीचा सहभाग हा मुद्दा उपस्थित केला.

### १. महात्मा गांधीजीवर पडलेला प्रभाव

महात्मा गांधीजीवर आईकडून वैष्णव धर्माचा प्रभाव जाणवतो. हिंदू, जैन, ख्रिश्चन, बौद्ध, इस्लाम प्रभाव पडलेला होता. हिंदू धर्मातील अध्यात्मवादी परंपरेचे दृढ संस्कार गांधीजीवर झालेले होते. त्याचबरोबर या धर्मातील भक्तीसंप्रदाय, प्युरिटन ख्रिस्ती धर्ममत याचाही त्यांच्यावर प्रभाव पडलेला होता. आत्म्याचे अमरत्व, अनुपात, आत्मशुद्धी, पुनर्जन्म, कर्मविपाक या कल्पना त्यांच्या लिखाणात जागोजागी आढळतात. शंकराचार्याच्या अद्वैतवादाकडेही ते आकृष्ट झाले. परंतु कुठेही एकमत त्यांनी प्रमाण मानले नाही.[१]

त्याचबरोबर हिंदू म्हणून घेण्यात अभिमान वाटे. वेद, उपनिषद, पुराणे याबद्दल आदर होता. भगवद्गीता हा सर्वश्रेष्ठ ग्रंथ ते मानत. पुनर्जन्म, मोक्ष, कर्मवाद, वर्णाश्रमधर्म या हिंदू धर्माच्या पायाभूत कल्पनांचा त्यांच्या विचारावर पगडा दिसतो. ते म्हणत की, बुद्धीप्रामाण्याच्या युगात प्रत्येक धर्माचा आदर एक आदेश सार्वत्रिक न्याय आणि तर्कबुद्धी यांच्या कसोटीस उतरला तरच तो ग्राह्य मानता येईल.[२]

लिओ टॉलस्टॉय, बटॉर्ड रसेल, थोरो यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता. त्यानुसार परमेश्वर प्राप्तीसाठी करावयाच्या व्रत-वैकल्यात शरीरश्रमाला समाविष्ट करणारे गांधीजी हे पहिले धर्मचिंतक होते. "अन्नात भावान्ति भूतानि पर्जन्यादन्त संभव: यज्ञात भवति पर्जन्मो यज्ञ कर्म समुद्भव:" या श्लोकात यज्ञाचा अर्थ गांधीजींनी शरीरश्रम असा लावला. एकादशव्रतात शरीरश्रमाचा समावेश केला. सर्वधर्म समभाव रूजवण्याचा त्यांनी प्रयत्न केला.[३]

उपरोक्त प्रभावातून गांधीजींचे स्त्रीदास्य विषयक विचार निर्माण झालेले दिसतात. अंत: प्रेरणा, त्याग, सहनशक्ती, धैर्य हे गुण पुरूषांपेक्षा स्त्रीमध्ये अधिक नाहीत असे कोण म्हणेल? स्त्री शिवाय पुरूष संभवतच नाही. अहिंसा हा जर माणसाचा स्वभावधर्म असेल तर भविष्यकाळ हा स्त्रियांच्या हातात आहे. गांधीजींनी स्त्री-पुरूष समानतेचा विचार मांडला. त्यांच्या मते "पती हा जर देव असेल तर पत्नी ही देवता आहे. ती दासी नाही तर समान हक्क असलेली सखी व सहचरी आहे. ते दोघे परस्परांचे गुरू आहेत."[४] कौटुंबिक पातळीवर मैत्रीपूर्ण-परस्पर सामंजस्याची विचारसरणी त्यांनी मांडली. पत्नीला त्यांनी सहधर्मीनी, अर्धांगिणी असे संबोधले परंतु स्वपत्नी कस्तुरबा गांधी सोबत ते पितृसत्ताकतेच्या आविर्भावात वर्तन करीत असाही आरोप त्यांच्यावर होतो. त्यांनी बऱ्याच वेळा पारंपारिक पतीचा हक्क दाखविला व त्याचा त्यांना पश्चातापही झालेला आपल्या आत्मकथनात सांगतात.[५]

### २. स्त्रियांना राजकीय कार्यात सामावून घेण्याचा प्रयत्न

महात्मा गांधीजींनी राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचा मर्यादित हेतू पुढे ठेवून स्त्रियांना राजकीय कार्यात सामावून घेण्याचा प्रयत्न केला. स्त्रियांचे राजकीय सबलीकरण घडवून आणून स्वातंत्र्य प्राप्तीसाठी स्त्री शक्तीचा उपयोग करून घेतला. त्याला मर्यादा होत्या. अशी टीका त्यांच्यावर केली जाते.[६]

स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित करणारी विचारधारा मांडताना ते श्रमकार्य भूमिका याबाबत दोघात फरक करतात. म्हणजेच लिंगाधारित श्रमाविभाजनाचे ते पुरस्कृर्ते होते ही बाब आधुनिक काळातील महिला संघटनांना मान्य होणारी नव्हती. गांधीजींच्या चळवळीत असलेल्या स्त्रियांच्या मोठ्या सहभागानंतर, स्वातंत्र्योत्तर काळात राजकारणामधील स्त्रियांचा ओघ ओसरून केवळ उच्चवर्णीय स्त्रियाच शिल्लक राहिल्या अशी टीका केली जाते.[७]

सुप्तावस्थेत असलेल्या भारतीय स्त्री शक्तीला आवाहन करणारे महात्मा गांधी हे विसाव्या शतकातील आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त असे महत्त्वाचे प्रयोगशील विचारतज्ज्ञ, तत्वज्ञ व समाजसुधारक संत होत. स्त्रियांची पारतंत्र्यातून मुक्ती झाल्याशिवाय भारताला नैतिक, भौतिक, आत्मिक क्षेत्रात प्रगती साधता येणार नाही हे त्यांनी समाजमनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला. मुलींना निर्जीव बाहुल्या न बनवण्याचा, शिक्षण घेण्याचा व शिक्षण घेतल्यानंतर स्वत:पेक्षा इतर दुर्दैवी भगिनीचा विचार करण्याचा तसेच सदाचरण चारित्र्य, पावित्र्य, संयम आत्मसात करीत पार्वती, सीता, दमयंती यासारख्या आदर्श ठरलेल्या स्त्री प्रतिमांपेक्षा वरचढ होण्याचा प्रयत्न करण्याचा संदेश दिला. शिक्षित स्त्रियांनी पाशात्य संस्कृतीचे अंधानुकरण न करता समस्त भारतीय स्त्रियांच्या उन्नतीकरीता झटावे, ज्ञानलालसा बाळगावी असा उपदेश केला.

**३. 'महिला' या शब्दाचा अर्थ शक्तीशाली**

पितृप्रधान कुटुंबव्यवस्था स्त्रीला मुळातच पराधीन व गुलाम बनविले हे त्यांना मान्य होते. कुटुंबव्यवस्थेचा असा सरसहा निषेध करणे हे उताविळपणाचे लक्षण आहे. लाखो हिंदू कुटुंबात स्त्रीया सुखासमाधानाने राहत आहेत. स्वत:च्या घरात त्या राण्या असतात आणि काही बाबतीत त्या नवऱ्यावर सत्ता गाजवितात. सद्य:स्थितीत गृहिणींना श्रमप्रतिष्ठा प्रदान करणारे असे विचार गांधीजींनी मांडले. स्त्रियांना स्वसामर्थ्याची जाणीव नसते. "महिला" या शब्दाचा अर्थ शक्तीशाली असा आहे. स्त्री ही त्यागाची व अहिंसेची मूर्ती असल्याने व तिच्याकडे संयम, सहनशीलता ही शक्ती असल्याने ती पुरूषापेक्षा श्रेष्ठ आहे. शील, अब्रु वाचविण्यासाठी पुरुषांवर अवलंबून राहण्याची खरे तर तिला गरज नाही. सीता, द्रौपदी यांनी स्वत:च्या पावित्र्याच्या सामर्थ्यावर स्वत्व राखले. स्वईच्छेशिवाय स्वाभिमान, अब्रुस ठेच लागत नसते हे स्त्रियांनी नीटपणाने समजून घ्यावे हे आवाहन ते करतात. आपण स्त्री असतो आणि पुरूषाने आपले खेळणे करू बघितले असते तर त्याविरुद्ध आपण बंड पुकारले असते असे मत स्पष्ट करून बलात्कारासारख्या पाशवी अत्याचार व त्यातून उद्भवणाऱ्या आत्महत्यांना रोखण्याचे आत्मबळ स्त्रियांना प्राप्त होईल हे निश्चितच हा स्त्री सबलीकरणाचा प्रयत्न गांधीजींनी केला.

स्त्री ही शोषिक, संयमी, त्यागी वृत्ती एकनिष्ठा, प्रेमळपणा, वत्सलता या गुणांमुळे जगात कोणाचेही ऱ्हदय जिंकू शकते. कर्तव्यदक्ष असते व गुरुपद मिळवू शकते. स्त्रिया पुरुषांच्या तुलनेत अधिक कर्तव्यदक्ष असतात. त्यांच्यातील प्रचंड इच्छाशक्तीला संधीची जोड समाजाने द्यावी जेणेकरून समाजाचे अखंड भले होईल. असे स्पष्ट करून स्त्री शक्तीस

सकारात्मकतेकडे वळण्याचा संदेश देतात. समाजातील लिंगाधारित पितृसत्ताक मानसिकतेला शह देण्याचा प्रयत्न गांधीजी करताना दिसतात.[८]

### ४. असहकाराच्या लढ्यात स्त्रियांचा सहभाग

महात्मा गांधीजीच्या असहकाराच्या लढ्यात अनेक सुशिक्षित मध्यमवर्गीय स्त्रिया उतरल्या. परदेशी कापडाची होळी, कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून चरख्यावर सुतकताई सावकाश शांतपणे करायचे काम असल्याने स्त्रिया ते अधिक गतीने करू शकतील. आर्थिक अडचणीत असणाऱ्या स्त्रियांना उत्पन्नाचे साधन मिळेल. विधवांना कायमची सोबत होईल. आर्थिक सुस्थितीत असणाऱ्या स्त्रियांनी सुतकताई केल्यास अनेक स्तरातील स्त्रियांना एकत्र आणणारा दुवा निर्माण होईल असे विचार मांडून स्त्रीदास्य विमोचनाच्या चळवळीची राजकीय आंदोलनाशी सांगड घातली.[९]

अहिंसेचा लढा, दांडी यात्रा, कायदेभंगाच्या चळवळीत स्त्रियांनी तुरुंगवासही भोगला. त्यामुळे स्त्रिया अबला आहेत हा भ्रम दूर झाला. स्त्रियांच्या राजकीय सबलीकरणाची पार्श्वभूमी स्वातंत्र्य चळवळीत निर्माण झाली. स्त्रियांच्या समान राजकीय हक्काच्या मागणीला नैतिक अधिष्ठान मिळाले. दारूबंदी, परदेशी मालाच्या होळया या कार्यक्रमात स्त्रियांचा सहभाग वाढविला, उच्चशिक्षित स्त्रियांना त्यामधून सर्वसामान्य लोकांच्या आशा आकांक्षाशी समरस होण्याची संधी मिळेल. स्त्रियांचे सामर्थ्य व आत्मविश्वास निर्माण होईल.

### ५. आंतरजातीय विवाहाचे पुरस्कर्ते

महात्मा गांधीच्या काळात पडदा बालविवाह, असंमत वैधव्य, विषम विवाह, देवदासी अशा अनेक चालीरीतीवर त्यांनी कडाडून विरोध केला. पुरूष जसे स्त्रियांना आपल्यावर विश्वास ठेवण्यास भाग पाडतात. तसाच आपल्या स्त्रियांवरही त्यांनी ठेवला पाहिजे. असे म्हणून पडदा पद्धतीला विरोध केला. 15 वर्षाखालील बालविधवांना कुमारिका मानून त्यांचा पुनर्विवाह करावा असा विचार ते व्यक्त करतात. प्रौढ विधवांना सन्यस्त जीवन जगावे. यामुळे प्रतिष्ठा व धार्मिक पातळी उंचावते असे त्यांचे मत होते. वैधव्याचे जीवन अशक्य वाटत असल्यास खुशाल पुनर्विवाह करावा. रमाबाई रानडेनी पती निधनानंतर जे समाजसेवेचे व्रत स्वीकारले त्यामुळे त्यांचा गांधीजींनी आदर्श विधवा म्हणून गौरव केला. बालवृद्ध विवाहावर ताशेरे ओढले. हुंड्याच्या प्रथेला विरोध केला. हुंडाप्रतिबंध करण्यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाहाचा पर्याय ठेवला.[१०]

73 व्या घटनादुरूस्तीने स्त्रियांना ग्रामपंचायत, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद या ठिकाणी 1/3 जागा स्त्रियांसाठी राखीव केल्या आहेत. त्याची पार्श्वभूमी गांधीजींच्या स्त्रीविषयक राजकीय सुधारणांमध्ये आहे. स्वराज्य प्राप्तीच्या कार्यात स्त्री-पुरूष दोघांना एकत्र येऊन सर्व संकटांना तोंड दिले पाहिजे. प्रसंगी स्वत:च्या जिवाची पर्वा करू नये तसेच तुरुंगवास भोगण्याची तयारी स्त्रियांनी दाखविली. राजकीय क्षेत्रातील पितृसत्ताकतेला शह देण्याचा प्रयत्न गांधीजीच्या स्त्रीविषयक सुधारणामधून झालेला दिसतो.[११]

## निष्कर्ष

१. सामाजिक पातळीवरील स्त्रीविषयक कुप्रथांवर गांधीजींनी आवाज उठविला. गांधीजींचे विचार पौराणिक स्त्री प्रतिमेवर आधारित वाटतात.

२. पारंपारिक पितृसत्ताक लिंगाधिष्ठित विचारधारेतून ते बाहेर येऊ शकत नाहीत; परतु त्यातही त्यांनी परंपरा व आधुनिकता याचे रसायन आपल्या विचारात निर्माण केले.

३. राजकीय पातळीवर स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचा सहभाग वाढवून राजकीय पुरूषी वर्चस्वाला शह देण्याचा प्रयत्न करून स्त्री शक्तीचे अलोट दर्शन गांधीमुळेच स्वातंत्र्य चळवळीत दिसून आले.

४. अबला व अशक्त अशी स्त्री प्रतिमा गांधीजींनी सशक्त व सबल बनवण्याचा प्रयत्न केला.

५. राजकीय पातळीवर स्त्रियांच्या सक्रिय सहभागातून आपोआपच राजकीय स्त्री सबलीकरण घडून येण्यास मदत झाली.

६. परिस्थितीनुरूप स्त्री स्वातंत्र्य, स्त्री सबलीकरणाला वेगळा अर्थ देण्याचा प्रयत्न गांधीजींनी केला.

७. शोषित, स्त्री कामगार, शेतमजूर हे गांधीजीच्या कार्यक्रमात दुर्लक्षित राहिले. अशी टीका मार्क्सवादी स्त्री संघटनकर्त्या करतात.

८. असे असले तरी परिस्थितीसापेक्ष स्त्री शक्तीचा देशकार्यासाठी उपयोग करून पारंपारिक लिंगाधिष्ठित पितृसत्तेची चौकट भेदून स्त्रीवाद आविष्कृत करण्याचा प्रयत्न गांधीजींच्या राजकीय क्षेत्रातील स्त्री सबलीकरणातून दिसून येतो.

९. महात्मा गांधीजींनी स्त्रियांसाठी जीवनात प्रयोगशील राहण्याचेही आवाहन केले.

१०. स्त्रियांनी पुरूषी प्रवृत्तीच्या प्रभावाखाली न येता स्वत:चे बळ हेरण्याचे गांधीजींचे आवाहन तर संपूर्णत: स्त्रीवादीच आहे.

## संदर्भ सूची

१. पंडित नलिनी, गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, तृतीय आवृत्ती, 27 जानेवारी 2000, पृ.55.

२. प्रभू आर.के. अणि यू.आर.राव (संपा.), “द माईंड ऑफ महात्मा गांधी”, नवजीवन प्रकाशन, पृ.102.

३. देसाई महादेवी, “गीता ॲकार्डिग टू गांधी”, नवजीवन प्रकाशन, 1946, पृ.175-176.

४. ‘गाधीजींची विचारधारा’, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, एप्रिल 1994, पृ.27.

५. गांधी (आत्मकथा), नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद, 1989, पृ. 8-9.

६. जैन प्रतिभा – शर्मा संगीता, “भारतीय स्त्री सांस्कृतिक संदर्भ”, रावत पब्लिकेशन, नई दिल्ली, 1998, पृ. 236.

७. विद्युत भागवत – शर्मिला रेगे (संपा.), "समकालीन कळीचे प्रश्न, स्त्रीवादी चर्चा विश्वाचा आढावा", प्र.का. स्त्री अभ्यास केंद्र, पुणे, प्रथमावृत्ती, 2000, पृ. 53.

८. नाईक शोभा, "भारतीय संदर्भातून स्त्रीवाद", स्त्रीवादी समीक्षा आणि उपयोजन, लोकवाङ्मय गृह, प्रथम आवृत्ती, जून 2007, पृ.50.

९. महात्मा खंड-2, पृ. 77.

१०. पंडित नलिनी, गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, तृतीय आवृत्ती, 27 जानेवारी 2000, पृ.225.

११. कलेक्टेड वर्क्स ऑफ म.गांधी, प्रतिमा जोशी, गांधी ऑन, विमेन, नवजीन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद, सेंटर फॉर विमेनस डेव्हलपमेंट स्टडीज, नई दिल्ली, 1988, पृ. 13.